# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३/०५/२०२१**

## जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१३/०५/२०२१ ते १७/०५/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 5 |
| कमाल तापमान (अं.से.) | 41 | 42 | 43 | 42 | 40 |
| किमान तापमान (अं.से.) | 26 | 29 | 29 | 28 | 26 |
| ढग स्थिती (आकाश) | 6 | 7 | 8 | 8 | 8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 37 | 35 | 34 | 46 | 53 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 14 | 16 | 14 | 20 | 30 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 15 | 8 | 14 | 28 | 28 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 303 | 226 | 133 | 127 | 151 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १३ ते १५ मे, २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून दि. १६ व १७ मे, २०२१ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता रोजी आहे. |
| सामान्य सल्ला | | • तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा अवेळी पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन घ्यावी.<br>• काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत.<br>• अवेळी पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>• जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• काढणी व मळणी झालेल्या धान्यास पावसाचा अंदाज बघून ६ ते ७ दिवस चांगले उन्हात वाळवून कोठीत साठवावे. धान्यात कडूनिंबाचा पाला ५ टक्के मिसळावा. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |

<table>
<tr><td colspan="2"></td><td>• एक वर्षाचे आतील नवीन लागवड केलेल्या फळपिकांचे (कलमे/ रोपे) कडक उन्हापासून संरक्षणासाठी सावली करावी तसेच खोडाभोवती पाला पाचोळ्याचे आच्छादन करावे.<br>• उन्हाळी भाजीपाला व फळबागांना शक्यतो सायंकाळी वारंवार व हलके ओलीत करावे. आवश्यक तेथे दोन पाण्याच्या पाळीतील अंतर कमी करावे. जमिनीतून होणारे पाण्याचे बाष्पीभवन कमी करण्यासाठी सर्वच पिके व फळबागांना वाळलेली पाने, काड्या, वाळलेले पाचट, गवत व काडीकच-याचे किंवा उभ्या पिकात प्लॅस्टीक अच्छादन करावे.<br>• खरीप हंगामाच्या पुर्वतयारीसाठी जमिनीची नांगरट करुन जमिन उन्हात तापू द्यावी. पुर्व मशागतीची कामे सुरु करावीत. तसेच बांध बंदिस्ती करुन घ्यावी.</td></tr>
<tr><td colspan="2">अवकाळी पाऊसा पूर्वी व नंतरच्या उपाययोजना</td><td>मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा अवेळी पाऊसाची शक्यता असल्याने फळ झाडांना व भाजीपाला पिकांना आधार द्यावा. शेतातील सर्व पिकक्षेत्रातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करावी. परिसरात वादळी वारे, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा असताना जर आपण शेतात असाल आणि जवळ कुठलाच पर्यायी आसरा नसेल तर उंच जागा, उंच झाडांनपासून दूर राहावे व शेवटचा पर्याय म्हणून लगेच गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्याच्या मध्ये ठेवावे. जमिनीशी कमीत-कमी संपर्क असावा. जनावरांना पाण्याच्या स्त्रोतांपासून जसे तळ, तलाव, नदी, ई. पासून लांब ठेवावे. जनावरांना शेतीच्या धातूंची अवजारांपासून, मोटर, सायकल व इतर वाहनांपासून दूर ठेवावे. अवकाळी पाऊसानंतर हवेत थंडावा निर्माण होतो, थंडीपासून फळबागांचे संरक्षणासाठी त्याच दिवशी बागेस विहिरीचे पाणी देवून हलके ओलीत करावे. अवकाळी पाऊसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी. थंडावा जास्त असल्यास बागेभोवती बांधावर काडीकचर्याचे ढीग करून ते पेटवून शेकोट्या कराव्यात. परिसरात वादळी वारे, अवकाळी पाऊसानंतर शेतातील उभ्या पिकाची पड झाली असल्यास पिक बांधणी करावी. परिसरात वादळी वारे, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा असताना विजेवर चालणाऱ्या वस्तू इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिकल वस्तू आणि यंत्रे बंद ठेवण्यात यावे. घराच्या खिडक्या व दरवाजे बंद ठेवा. घरा भवतीची उंच झाडे यापासून दूर राहावे. शेतीची अवजारे, मोटर सायकल व इतर वाहनांपासून दूर राहावे. गाडी चालवत असल्यास सुरक्षित स्थळी जाण्याचा प्रयत्न करावा. मोकळ्या तसेच लटकत्या विद्युत तारांपासून दूर राहा. जंगलामध्ये दाट लहान झाडाखाली उताराच्या जागेवर निवारा घ्यावा. इतर खुल्या जागेवर, दरी सारख्या खोल जागेवर जाण्याचा प्रयत्न करावा. वीज पडल्यास त्वरित रुग्णवाहिका व वैद्यकीय मदत बोलवा, त्याला हात लावण्यास धोका नाही. मेघगर्जना व वादळ असल्यास उंच जागांवर, टेकडीवर, मोकळ्या जागांवर, स्वतंत्र एकटी झाडे, रेल्वे, बसस्थाने, दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, उघडी वाहने आणि पाणी टाळावे. घरात असल्यास वायर द्वारे जोडले गेलेले फोन, मोबाईल व इतर इलेक्ट्रिकल उपकरणे, विद्युत जोडणीस हात लावू नये. मेघगर्जना व वादळा दरम्यान विजा चमकताना कोणत्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. या दरम्यान आंघोळ करणे, हात धुणे, गाडी धुणे, कपडे धुणे हे कार्य करू नये. प्रवाहकीय पृष्ठभागाशी संपर्क टाळावा. धातूची तारे, खिडक्यांची तावदाने, वायरिंग व नळ घराबाहेर असल्यास मेघगर्जनाच्या वेळी विजा चमकत असताना झाडाखाली किंवा झाडाजवळ उभे राहणे, वाहनांच्या, धातू किंवा विजेच्या भागाशी संपर्क टाळावा. अधांतरी लटकणाऱ्या लोंबणाऱ्या वायर पासून लांब रहा. विजा चमकत असताना शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. घरातील विद्युत उपकरणे बंद ठेवावी. जनावरांना सुरक्षित स्थळी ठेवावे. घराबाहेर असताना किंवा वादळी वारे वाहत असताना झाडाजवळ उभे राहू नये. सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा.</td></tr>
<tr><td>भुईमूग</td><td>आऱ्या सुटण्याची ते शेंगा पोसण्याची</td><td>आ-या जमिनीत जाण्याच्या वेळी ते शेंगा पोसण्याची कालावधीत पिकास पाण्याचा ताण पडणार नाही याची दक्षता घ्यावी. भुईमुगास शक्य असल्यास स्प्रिंकलर पद्धतिने पाणी द्यावे. कोरडे हवामान लक्षात घेता उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूरा प्रमाणे स्थानिक परिस्थिती, जमिनीची</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | खोली, जमिनीचा प्रकार व गरजेनुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. शेंगा तयार होत असताना जास्तीत जास्त शेंगा तयार होण्यासाठी ७० ग्रॅम ००:५२:३४, ५० ग्रॅम मल्टीमायक्रोन्युट्रीएंट प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| नविन फळबाग लागवड | लागवड पूर्व तयारी | नविन फळबाग लागवड करण्यासाठी फळपिकांच्या शिफारस अंतरानुसार १x१x१ मि. चे खड्डे खोदुन तयार करावेत जेणेकरून खड्याच्या आतील बाजूस व उकरलेल्या मातीस ऊन लागून निसर्गतः किडींचे नियंत्रण होईल. |
| कापूस | पूर्व तयारी | कापसावरील सेंद्रिय बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कापुस पेरणीपुर्वी आधीच्या पिकांची धसकटे, पळकाट्या, पाला व इतर कचरा गोळा करुन तो जाळावा व शेत स्वच्छ ठेवावे. त्यामुळे कीड व रोग यांच्या सुप्तावस्था नष्ट होण्यास मदत होते. |
| ऊस | वाढीची अवस्था | उन्हाळा चालू झाल्याने उसाला योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. ऊस पिकासाठी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. पाचट आच्छादनाचा वापर करून सरी आड सरीतून पाणी द्यावे. उसात खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास एकरी दोन फुले ट्रायकोकार्डची १० दिवसाच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ प्रसारणे करावीत. रासायनिक नियंत्रणासाठी क्लोरॅन्ट्रनिलोप्रोल (**Chlorantraniliprole**) १८.५ % एस.सी., ४ मिली प्रति १० लीटर पाण्यातून अथवा ०.४ % जी १८.७५ किलो प्रति हेक्टरी वापरावे. |
| मिरची | पिक वाढीची अवस्था | पांढरी माशी नियंत्रणासाठी पिवळे तसेच फुलकिड्यांसाठी निळे चिकट सापळे वापरावेत. रासायनिक कीडनाशकांचा वापर करावयाचा झाल्यास फुलकिडे नियंत्रणासाठी फिप्रोनील (५ ई.सी.) १५ मिली किंवा स्पिनोसॅड (४५ ई.सी.) ४ मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळ धारण अवस्था | टोमॅटो वरील फळे पोखरणारी अळी - ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरून आत शिरते व गर खाते या किडीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली किंवा क्लोरॅनट्रॅनीप्रोल १८.५% एस.सी ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या कराव्यात. |
| लिंबू वर्गीय पिके | | सिट्रस सायला या रस शोषणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली क्विनॉलफॉस २५% प्रवाही किंवा ५.५ मिली नोवालुरॉन १०% प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| आंबा | फळधारण अवस्था | नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना वाऱ्यापासून संरक्षणासाठी काठीचा आधार द्यावा. मोठ्या झाडांना फळधारणेनंतर जमिचा प्रकार, झाडाचे वय, पाण्याची उपलब्धता ई. विचारात घेवून योग्य वेळेच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. बागेत झाडांच्या आळ्यांमध्ये गवत, पालापाचोळा ई. अछ्यादनाचा वापर करावा. फळ पिकण्याच्या अवस्थेत असताना फळमाशीची मादी फळांच्या सालीत अंडी घालते. त्यातून बाहेर येणा-या अळ्या गरावर उपजीविका करतात. किडीच्या नियंत्रणासाठी कीडग्रस्त फळे नष्ट करावीत. झाडाखाली जमीन नांगरावी. तसेच फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथिल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत. पक्व झालेल्या आंब्याची काढणी शक्यतो सकाळी दहापुर्वी किंवा दुपारी ४ नंतर करावी तसेच आंबा फळांची वाहतुक शक्यतो संध्याकाळी करावी. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुरक्षित ठिकाणी पिकण्यासाठी ठेवावे. |
| केळी | | वाढते तापमान लक्ष्यात घेता बागेस योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करावा. बागेत केळी वाफ्याच्या मधल्या जागेत केळी पाने, जुना गव्हाचा भुसा, उसाचे पाचट, सोयाबीन भुसा, गवत, पालापाचोळा यांचा वापर करून सेंद्रिय आच्छादन करावे. केळीच्या बुंध्याजवळ वाढणारी पिल्ले नियमित कापावीत तसेच केळीवरील जुनी वाळलेली व रोगट पाने कापून बाग स्वच्छ ठेवावी. केळीच्या घडाचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी केळीच्या वाळलेल्या पानांची पेंडी करून घड व घडाचा दांडा झाकावा. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| फुल झाडे | | जरबेरा, कार्नेशन या फुल झाडावरील लाल कोळी या किडीच्या नियंत्रणासाठी डायकोफॉल १५ |

| | | |
|---|---|---|
| | | मिली किंवा अब्यमेक्टीन ४ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व विविध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/ टोचून घ्यावे. वातावरणातील उष्णता वाढल्यामुळे जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते व हे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा किंवा खाद्य खातात. याचा एकूणच जनावरांच्या वाढीवर, प्रजननावर व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे पुढील नुकसान टाळण्यासाठी उन्हाळ्यात जनावरांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.<br>१) जनावरांचा गोठा थंड जागी किंवा झाडाखाली बांधावा. गोठ्याच्या छपरावर गवत, पाला, पाचोळा, नारळाच्या झावळ्या टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहतो.<br>२) उन्हाळ्यामध्ये जनावरांना ३-४ वेळा थंड व स्वच्छ पाणी पाजावे. गोठ्यात पाण्याची स्वतंत्र सुविधा केलेली असल्यास पाण्याचे भांडे सावलीत असावे व भांडे मुख्यत: माती किंवा सिमेंटपासून बनवलेले असावे जेणेकरून त्यात पाणी दिवसभर थंड राहील.<br>३) जनावरांना उन्हाळयात दुपारच्या वेळी चरावयास पाठवू नये.<br>४) दुपारच्या वेळी जनावरांना हिरवी मका, चवळी, कडवळ, लसूणघास यासारखे पोषण वैरण द्यावे. त्यामुळे दूध उत्पादनात सातत्य टिकून राहते व प्रजनन क्षमताही सुधारते.<br>५) आहारामध्ये वाढीव क्षार मिश्रणाचा वापर करावा व 'अ' जीवनसत्वाचा पुरवठा करण्यासाठी जास्तीत जास्त हिरवा चारा द्यावा.<br>६) उन्हाच्या तीव्रतेपासून संरक्षण होण्यासाठी जनावरांना पुरेसा निवारा उपलब्ध करून द्यावा. गोठा हवेशीर असावा, गरम हवा बाहेर जाण्यासाठी व थंड हवा आत येण्यासाठी जागा असावी.<br>७) म्हशींमध्ये घर्मग्रंथी कमी असल्यामुळे घामातून त्यांच्या शरीरात उष्णतेचे उत्सर्जन होत नाही त्यामुळे म्हशींना पाण्यात डुंबु द्यावे. गायीच्या अंगावर ओले कपडे किंवा गोणपाट भिजवून ते गाईच्या पाठीवर ठेवावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : १३.०५.२०२१

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**